REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# वस्तू व सेवा कर : एक वरदान




डॉ. आसावरी आर. दुर्गे
सहाय्यक प्राध्यापक , तायवाडे महाविद्यालय, कोराडी, महादुला.

भारतात कर व्यवस्थेला सुधारण्याची आवश्यकता मागील दशका पासून केल्या जात आहे. संपूर्ण जगात भारतीय अर्थव्यवस्थेला एक विकसीत अर्थव्यवस्थेच्या रूपामध्ये ज्या प्रमाणे पाहीले जात आहे. त्याला साकार रूप देण्याकरीता व अर्थव्यवस्थेची गति वाढविणे, आर्थिक विकासाचा पाया मजबूत करून एक स्थानिय व क्षेत्रीय विकास करण्याच्या उद्देशाने वस्तू व सेवाकर लागू करण्यात आला.

वस्तू व सेवा कर (GST)हा भारतातील अप्रत्यक्ष कर क्षेत्रातील सुधारणांचे लक्षणीय पाऊल आहे. भारतात वस्तू व सेवा कर(GST) ची अमंलबजावणी 1 जुलै 2017 पासून केली गेली आहे. जीएसटी ला 1947 नंतरचे सर्वात महत्वाचे कर सुधारणा विधेयक म्हणून बघितले जाते. ही भारताच्या कर संरचनेत सुधारणेची एक मोठी क्रांती आहे. हा एक गंतव्य स्थान आधारित वस्तू आणि सेवा यांच्या उपभोगावरील कर आहे. यामध्ये निर्मिती किंवा उत्पादना पासून ते अंतिम उपभोगापर्यंत प्रत्येक टप्प्यावर कर आकारणी करण्याचे प्रस्तावित केले आहे. मागील टप्प्यावर अदा केलेल्या कराची जमा रक्कम समायोजित करता येईल. हयाचा अर्थ असा की केवळ वर्धित मूल्यावर कर आकारला जाईल आणि अंतिम उपभोक्ता किंवा ग्राहकाला कराचे ओझे सहन करावे लागेल.

जिथे(GST) जीएसटी लागू नाही तेथे वस्तू व सेवांवर वेगवेगळे कर लावले जाते. जीएसटी एक एकीकृत कर आहे तो वस्तू व सेवा या दोन्हींवर लावला जातो.

## वस्तू व सेवा कराचा इतिहास :

भारतीय संविधाना नुसार मूख्य रूपाने वस्तूंवर विक्रीकर लावण्याचा अधिकार राज्य सरकार आणि वस्तूच्या उत्पादन व सेवांवर कर लावण्याचा अधिकार केंद्र सरकार जवळ होता. हया कारणामुळे देशात वेगवेगळया प्रकारे कर लावले जात होते. ज्यामुळे देशाची कर व्यवस्था खुप गुंतागुंतीची होती. कंपन्याना व छोटया व्यावसायिकांना वेगवेगळया प्रकारच्या कर नियमांचे पालन करणे कठीण होते.

या वस्तू व सेवा करावर जवळपास 15 वर्षे विचार मंथन सुरू होते. डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली 2003 मध्ये नेमण्यात आलेल्या "टॉस्क फोर्स" ने सर्वप्रथम ही संकल्पना आपल्या अहवालात मांडली होती. व्हॅट च्या तत्वावर आधारित एकीकृत वस्तू व सेवा कराची ही संकल्पना होती. यावर नंतरच्या काळात विचार विनिमय, चर्चा करण्यात आली. 2006 मध्ये तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम् यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात या संकल्पनेचा उल्लेख केला आणि साधारण पणे 2010 मध्ये अंमलबजावणी करण्याची मुदत ठरविण्यात आली. 2009 मध्ये या विषयावरच्या चर्चेसाठीचा एक दस्तावेज जारी करण्यात आला होता. त्याच्याच जोडीला राज्याच्या अर्थमंत्र्यांची एक समिति नेमून या संकल्पनेवर विचार विनिमय करण्यात आले. 2011 मध्ये जीएसटी लागु करण्यासंबंधी विधेयक प्रथम मांडण्यात आला. ते संसदीय स्थायी समिती कडे पाठवण्यात आले. 2013 मध्ये समितीने अहवाल दिला. परंतु हया दरम्यान बीजेपी पार्टीनी या विधेयकाचा विरोध केला होता. 2013 मध्ये संसदीय समितीचा अहवाल आला. परंतु तो पर्यंत लोकसभा निवडणुकीच्या हालचाली सुरू झालेल्या होत्या. त्यामुळे हे विधेयक मागं पडल. 2014 मध्ये नरेंद्र मोदी, पंतप्रधान झाले आणि त्यांनी हया विधेयकाला राष्ट्र

हिताचा सांगून त्याचा पाठपुरावा केला. 2015 मध्ये भाजपच लोकसभेत संख्याबळ अधिक असल्याने ते समंत करण्यात आलं. परंतु राज्यसभेत कॉंग्रेसने ते अडवून ठेवल.

केंद्र सरकारने 27 मार्च 2017 ला विरोधकांच्या हरकतीकडे दुर्लक्ष करत जीएसटी अर्थात वस्तू व सेवा कराशी संबंधित 4 विधायके लोकसभेच्या पटलावर सादर केली. त्यात केंद्रीय वस्तू व सेवाकर विधेयक 2017 (सी – जीएसटी, 'एकीकृत वस्तू व सेवा कर विधेयक – 2017 (आय – जीएसटी), 'संघ राज्य क्षेत्र वस्तू व सेवा कर विधेयक (युटी – जीएसटी) व वस्तू व सेवा कर (राज्यांना नुकसान भरपाई) विधेयक – 2017' ही 'जीएसटी' शी संबंधित 4 विधेयक लोकसभेत सादर करण्यात आली. 6 एप्रिल 2017 ला राज्यसभेत ही 4 विधेयके कोणतेच संशोधन न करता मंजुर करण्यात आली. 13 एप्रिल 2017 ला राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जींनी बजट सत्रात संसद सदनात हे विधेयक पारित झाल्यानंतर जीएसटी शी संबंधित या 4 विधेयकांना मंजुरी दिली. वस्तू व सेवा कराची अमलबजावणी 1 जुलै 2017 पासून केली गेली.

## वस्तू व सेवाकर(GST) :

जीएसटी साठी केंद्र सरकारने देशाच्या संविधानामध्ये 122 वी दुरूस्ती केलेली आहे. या कायद्यामध्ये एकंदर 21 प्रकरणे, 174 कलमे आणि 3 परिशिष्टे आहेत. यामध्ये कर आकारणी व कर संकलन कलम 5, आंतरराज्य पुरवठा कलम 7, राज्यअंतर्गत पुरवठा कलम 8, समुद्र किनाऱ्याच्या हद्दीत केलेला पुरवठा कलम 9, वस्तू व सेवांचा किंवा दोन्ही पुरवठयाचे ठिकाण 10, भारतात आयात केलेल्या किंवा निर्यात केलेल्या वस्तुच्या पुरवठयाचे कलम 11, सेवेचा पुरवठा करण्याऱ्या व्यक्तीचे व तो स्वीकारणाऱ्या व्यक्तीचे ठिकाण भारतात असेल तर कलम 12.

जीएसटी हा एकीकृत कर आहे. तो वस्तू सेवा या दोन्हीवर लावला जातो. भारताच्या घटनेनुसार संपूर्ण देश हा 29 राज्यामध्ये विभागला आहे. प्रत्येक ठिकाणी दोन सरकारांचे अधिमुल्य चालते. आपल्या खर्चासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून दोन्ही सरकार वेगवेगळे कर लावतात. जीएसटी हा एक कर जरी असला तरी त्यामध्ये 4 करांचा अंतर्भाव आहे.

1. केंद्रीय वस्तू व सेवा कर (CGST)
2. राज्य वस्तू व सेवा कर(SGST)
3. एकात्मिक वस्तू व सेवा कर(IGST)
4. संघ राज्य वस्तू व सेवा कर (UTGST)

हे कर लावले जाणार असल्याने करदात्यांना कर आकरणी साठी सुटसुटीत व सुरळीततेचा अनुभव येईल. ज्या कर प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात उपभोग स्थान असेल, त्या प्राधिकरणाकडे कर जमा होईल ही आहे. या उपभोग स्थळाला "पुरवठा स्थान" अशी ही संज्ञा देता येते.

जीएसटी (GST) लागू झाल्यामुळे संपूर्ण देशभरात एकाच प्रकारचा अप्रत्यक्ष कर राहतो. ज्यात व्यवसायीकांनी खरेदी केलेल्या वस्तू आणि सेवांवर चुकवीलेल्या जीएसटी ची पूर्ण क्रेडीट मिळेल. ज्याचा उपयोग ते विक्री केलेल्या वस्तू व सेवांवर लावलेल्या जीएसटीच्या देण्याकरीता करतील.

1. जीएसटी केवळ अप्रत्यक्ष करांना एकीकृत करतो प्रत्यक्ष करावर त्याचा प्रभाव होत नाही ते स्थिर राहतात.
2. जीएसटी लागू झाल्यामुळे पूर्ण भारतात एकाच प्रकारचा अप्रत्यक्ष कर लागतो त्यामुळे वस्तुंची व सेवांच्या लागत मध्ये स्थिरता येते.
3. संघिय आराखडण्याला बनवून ठेवण्यासाठी जीएसटी दोन स्तरावर लागेल. सीजीएसटी (CGST) (केंद्रीय वस्तू व सेवा कर) आणि (SGST) एसजीएसटी (राज्य वस्तू व सेवा कर) आणि सीजीएसटी चा हिस्सा केंद्राला व एसजीएसटी चा हिस्सा राज्य सरकाला प्राप्त होतो. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वस्तू व सेवांच्या विक्रीच्या स्थितीत आयजीएसटी (एकीकृत वस्तू व सेवा कर) लागतो. (IGST) आयजीएसटी चा एक हिस्सा केंद्र सरकार ला व दूसरा हिस्सा वस्तू व सेवा चा उपयोग करण्याऱ्या राज्याला प्राप्त होतो.
4. जीएसटी अंतर्गत सर्व व्यावसायीक, उत्पादक आणि सेवा प्रदान करण्याऱ्यांना रजीस्टर करणे आवश्यक आहे. ज्याचे वर्षभरात एकूण विक्रीचे मूल्य एक निश्चित मूल्यापेक्षा जास्त आहे.

5. प्रस्ताविक जीएसटी मध्ये व्यवसायीकांना मुख्य रूपाने तीन वेगवेगळया प्रकारचे टॅक्स भरावे लागतात. ज्यात इनपुट टॅक्स, आऊटपुट टॅक्स आणि एकीकृत रिटर्न यांचा समावेश आहे.

## वस्तू वरील जीएसटी दर :

| % GST | 5% GST | 12% GST | 18% GST | 28% GST |
|---|---|---|---|---|
| ताज्या भाज्या | खादय तेल | लोणी | केश तेल | पेन्ट |
| पॅक बंद न केलेले | स्किल्ड दूध | तूप | टूथ पेस्ट | डिओडरेन्ट |
| अन्न धान्य | साखर | बदाम | साबून | शेविंग क्रिम |
| दुध | चहापत्ती | फ्रुट | पास्ता | सनक्रिम |
| दहि / लस्सी | भाजलेल्या कॉफी | ज्यूज | कॉर्मप्लेक्स | वॉल पेपर |
| अंडी | बीया | पॅक बंद नारळ | सूप | चॉकलेट |
| पीठ (ब्रॅडविरहीत) | मसाले | पाणी | आईस्क्रीम | पान मसाला |
| बेसन | पिज्जा / ब्रेड | भाज्या | पेस्ट्रीज केक | डिश वॉटर |
| ब्रेड | रस | जाम, जेली | मिनरल वॉटर | वॉशींग मशीन |
| पॅकबंद नसलेले पनीर | साबूदाना | मुरब्बा | काम्प्यूटर | ऑटोमोबाईल्स |
| मध | केरोसीन | लोणचे | प्रिंटर | मोटार |
| फिश | पॅकबंद पनीर | फळे | टेलिकॉम सेवा | सायकल |
| चिकन | काजू | शेंगदाणे | आय टी सेवा | |
| वर्तनाम पत्र | घरघुती | छत्री | ब्रान्डेड गारमेन्ट | |
| शैक्षणिक सेवा | वापराचाLPG | मोबाईल | | |
| आरोग्य सेवा | पादत्राणे (रू500 | शिलाई मशीन | | |
| मीठ | पर्यंत) | सेल फोन | | |
| फुलवारी झाडू | कपडे (रू.1000 | | | |
| काजळ | पर्यंत) | | | |
| | रेल्वे टीकीट | | | |
| | लहान हॉटेल | | | |
| | अगरबत्ती | | | |

वरील वस्तू व सेवाकर दर आकारणीच्या स्वरूपावरून असे लक्षात येते की, वस्तू व सेवाकर दराची आकारणी लोकांची कर देण्याची मानसीकता लक्षात घेऊन करण्यात आली आहे. परंतु काही कराचे दर पुन्हा तपासण्याची गरज आहे. बराचश्या वर्गीकरणाची रचना शास्त्रीय दृष्टीने योग्य आहे, असे वाटते.

## जीएसटी मुळे होणारे फायदे :

1. एकच कर असल्यामुळे करात पारदर्शकता येईल कर भरणे सोपे जाईल कर आकरण्याच्या पद्धतीत सहजता आणि सूलभता येईल.
2. कराची चोरी किंवा कर न भरणे किंवा कमी भरणे यावर प्रतिबंध येईल.
3. देशाच्या जी.डी.पी. मध्ये वाढ होईल व देशाचा विकास होईल.
4. वेगवेगळे कर भरण्यापासून सुटका होईल. त्यामुळे करप्रणाली सोपी व कार्यक्षम होईल त्यामुळे सरकारकडे कराची जमा होणारी रक्कम वाढेल आणि वस्तूच्या किंमती कमी होईल.
5. कर प्रणालीत पारदर्शकता आल्यामुळे राज्यांना मिळणाऱ्या वॅट, मनोरंजन कर, लक्झरी कर, प्रवेश कर, लॉटरी कर आणि विक्री कर बंद होतील. वस्तु खेरदी करतांना किंवा सेवा घेतांना सर्व कर मिळून 30 ते 35% कर दयावा लागत होता तो जीएसटी मुळे 20 ते 25% इतका दयावा लागेल.
6. कर वाचवण्यासाठी कंपन्या आपली उत्पादने राज्यात विकत राज्याच्या बाहेर उत्पादने विकल्यास केंद्रीय विक्रीकर आणि प्रवेश कर लागत असे त्यामुळे देशातील चांगली उत्पादने देशाच्या सर्वच भागात मिळत

नव्हती ती जीएसटी मुळे सर्वत्र मिळवयास लागतील त्यामुळे ग्राहकांना निवड करायला जास्त वाव मिळेल तसेच कंपन्यांना मोठी बाजरपेठ उपलब्ध होईल.

7. जीएसटी मुळे असंघटीत उदयोगही कराच्या जाळयात येईल त्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढेल आणि संघटीत व असंघटीत क्षेत्रातील तफावत कमी होईल.
8. जीएसटी अंतर्गत विविध प्रकारच्या वस्तुचे वर्गीकरण सोपे व साधे केले आहे यामुळे कर लावण्यासाठी कोणत्याही वस्तूचे वर्गीकरण वादग्रस्त ठरणार नाही.
9. संपूर्ण देशात वस्तू खरेदी करण्यासाठी एकच कर आणि एकाच दराने कर दयावा लागत असल्यामुळे देशात एकाच किंमतीला वस्तू खरेदी करता येईल.
10. ज्या उदयोगांची वार्षिक उत्पादकता 20 लाख रूपयापर्यंत आहे अशा उदयोगांना जीएसटी मधून मूक्त ठेवण्यात आल्याने त्याचा फायदा लहान उदयोगांना होईल.
11. पहीली तीन वर्ष राज्यांना 100% भरपाई दिली जाणार आहे. चौथ्या वर्षी 75% तर पाचव्या वर्षी 50% भरपाई दिली जाईल. त्यामुळे राज्यांना त्याचा फायदा होईल.
12. वस्तू व सेवाच्या किंमती दिर्घकाळ पर्यंत स्थिर राहतील याचा फायदा ग्राहकांना निश्चित होईल. तसेच व्यापाऱ्यांच्या मात्रेत वृद्धी होईल.
13. जीएसटी मुळे उत्पादक कंपन्यांना फायदा होवून देशात एकसंघ बाजारपेठ तयार होईल.
14. व्यावसायीकांना वेगवेगळे कर दयावे लागणार नाही त्यामुळे व्यावसायीकांच्या वेळेची बचत होऊन ते अधिक व्यवसायाकडे लक्ष देवू शकतील.
15. राज्यांना पहिली पाच वर्ष केंद्र सरकार महसूलात तोटा भरून देईल त्यामुळे राज्यांची आर्थिक स्थिती सूधारण्यात मदत होईल. ज्या राज्यात ग्राहक वर्ग मोठा असेल त्या राज्यांना करात जास्त वाटा मिळेल.

वरील सर्व लाभाचा विचार केला तर जीएसटी मुळे देशात कर चुकवेगीरीला आळा बसून देशाचा विकास होण्यास मदत होईल.

## जीएसटी चा विविध क्षेत्रावर होणारा परीणाम :

### 1) बँकिंग, सेवा वर जीएसटीचा परिणाम

1. बँका व बिगरबँक वित्तसंस्था यांना प्रत्येक राज्यातील कामकाजासाठी जीएसटी अंतर्गत वेगळी नोंदणी करावी लागणार आहे.
2. एकाच बँकेच्या दोन शाखामधील व्यवहाराकरीता कर लागू शकेल त्यामुळे बँकांची शाखानिहाय डोकेदूखी वाढणार आहे.
3. बँकांना स्वतःच्या संगणकीय प्रणालीत बदल करून घ्यावे लागतील खातेनोंदणी पद्धत, प्रशासन, नियंत्रणाची पद्धत यामध्येही बदल करावे लागणार आहे.
4. डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, चेक क्लिअरन्स, आरटीजीएस, निधी हस्तांतरण, डिमेंट खाते इ. सेवा पूरवितात या जीएसटीत वित्तसेवावरील सेवा कर वाढवून 18% करण्यात आलेल्या आहे. त्यामुळे या सर्व सेवा वाढयाची शक्यता आहे.
5. बँका व बिगरबँक वित्तसंस्था यांच्याकडून फंड आधारीत शुल्क आधारीत व वित्त अशा सेवांवर जीएसटीचा सर्वाधिक प्रभाव पडेल.

### 2) एफएमसीजी क्षेत्रावर जीएसटीचा परिणाम

1. एफएमसीजी उदयोगांना पूर्ण इनपूट टॅक्स क्रेडिट मिळणार आहे. त्यामुळे जाहीरातीचा खर्च कमी होण्याची शक्यता आहे.
2. वाहन उदयोगातील कंपन्यांना इनपूट क्रेडिटचा लाभ मिळणार असल्यामुळे वाहनाच्या जाहीरातीवरील खर्च कमी होईल.
3. गुळ, तृणधान्य, दूध या सारख्या वस्तूवर जीएसटी नसल्यामुळे खादयपदार्थ तयार करण्याचा खर्च कमी होवू शकतो.

4. हेअर ऑईल, टूथपेस्ट, साबण यांच्यावर 18% जीएसटी लागू झाल्यामुळे काही राज्यामध्ये यापेक्षा जास्त कर असल्यामुळे जीएसटी नंतर या वस्तू स्वस्त झाल्या आहेत.
5. गोड केलेले एअरिएटेड तसेच विविध स्वादाचे पाणि यावर 40% पर्यंत जीएसटी लागल्यामुळे एअरिएटेड पेय 12% जीएसटी व 12% उपकर लागू झाल्यामुळे शितपेयाच्या किंमतीत वाढ.
6. आयुर्वेदिक उत्पादनावर 12% जीएसटी असल्यामुळे औषधवजा उत्पादन महागणार आहे. मात्र अन्य एफएमसीजी उत्पादने 18% जीएसटी अंतर्गत येणार आहे. त्यामुळे किंमती नियंत्रीत ठेवणे शक्य झाले आहे.

### इलेक्ट्रानिक्स क्षेत्रावर जीएसटीचा परिणाम :

1. इलेक्ट्रॉनिक उपकरणे – वॉशिंग मशिन, रेफ्रिजरेटर, व्हॅक्यूम क्लिनर, वॉटर हिटर, मिक्सर, टोस्टर या सर्वांवर 28% जीएसटी लागल्यामुळे या वस्तू महाग होण्याची शक्यता आहे
2. कॅमेरा, मॉनिटर, टिव्ही – टी.व्ही. कॅमेरा, स्पीकर, संगणक मॉनिटर यांच्यावर 18% जीएसटी लागल्यामुळे या वस्तुंची किंमत थोडी वाढली आहे.
3. स्मार्ट फोन – सध्या स्मार्ट फोन एकूण 13.5% कर लागतो आहे. तो जीएसटी लागू झाल्यानंतर 12% वर येणार आहे. त्यामुळे स्मार्ट फोन स्वस्त होतील. स्मार्ट फोन तयार करण्यासाठी लागणारे सुटे भाग 12% जीएसटी अंतर्गत येणार आहे. मेक इंडिया अंतर्गत देशात तयार होणाऱ्या स्मार्ट फोन ला आणखी सवलती देण्याचे सरकारने ठरविल्यास स्मार्ट फोन आणखी स्वस्त होतील.

### मनोरंजन क्षेत्रावर जीएसटीचा परिणाम :

1. मनोरंजन क्षेत्रामध्ये ग्राहकांवरील कराचा बोझा कमी होणारे आहे.
2. मल्टिप्लेक्सना 27%कर दयावा लागत आहे. जीएसटी लागू झाल्यानंतर कराचा बोझा कमी झाला आहे.
3. स्थानिक संस्थाकडून लावला जाणारा मनोरंजन कर मूळ जीएसटी बरोबर लावला जाणार आहे.
4. पीव्हीआर सारख्या चित्रपटगृह साखळीसाठी जीएसटी लागू होणे पथ्यावर पडणार आहे. चित्रपट निर्मात्यांसाठी जीएसटी लाभदायक आहे.
5. ग्राहकांना 14.5 ते 15% कर सर्व प्रकारच्या प्रसारण सेवेसाठी टि.व्ही. केबल, डीटीएच फिल्म तसेच डिजीटल माध्यमासाठी दयावा लागत आहे. यावर 8 ते 12% अन्य कराचा बोझा आहे. जीएसटी नंतर 18 ते 20% कर दयावा लागणार असल्यामुळे ग्राहकांवरील कराचा बोझा कमी झाला आहे.

**किंमती वाढण्याची शक्यता** : जीएसटी 5, 12, 18 व 28 अश्या चार स्तरात येणाऱ्या वस्तूंच्या किंमतीत काही क्षेत्रातील वस्तूंच्या किंमती पहिल्यापेक्षा अधिक कर लागल्यामुळे त्या क्षेत्रातील वस्तूंच्या किंमती वाढल्या आहेत.

**विविध राज्यात नोंदणी आवश्यक** : एकाच वेळी अनेक राज्यात व्यवसाय करणाऱ्या एसएमईसह अन्य उद्योगांना प्रत्येक राज्यात स्वतंत्र नोंदणी करून घ्यावी लागणार आहे. त्यामुळे कर पूर्ततेकरीता उदयोगांवर बोझा वाढणार आहे.

**व्यवसायासाठी संगणकीय रचनेत बदल** : केन्द्रीय उत्पादन शुल्क मूल्यवर्धित कर व सेवाकर भरता यावा यासाठी देशातील जवळपास प्रत्येक एसएमईने विशेष संगणकीय सॉप्टवेअर किंवा ईआरपी तयार करून घेतले आहे. जीएसटी लागू झाल्यानंतर यामध्ये त्यांना बदल करून घ्यावा लागणार आहे. नवीन प्रणाली वापरण्याचे प्रशिक्षण कर्मचाऱ्याला दयावे लागणार आहे.

**कामकाज खर्चात वाढ** : अनेक एसएमई स्वतःच्या अप्रत्यक्ष कराचे विवरणपत्र भरत आहे. प्राप्ती करा प्रमाणेच स्वतः विवरणपत्र भरणे या छोटया उदयोगाना सोईचे जाते. तसेच त्यासाठी वेगळा कर्मचारी ठेवणे किंवा बाहेरून सेवा घेणे या उदयोगांना बऱ्याचदा परवडत नाही जीएसटी ही अप्रत्यक्ष कराची वेगळीच व नविन पद्धत असल्यामुळे एसएमईनी त्यासाठी बाहेरून सेवा घ्यावी लागत आहे. त्यामुळे कामकाज खर्चात वाढझाली आहे.

## निष्कर्ष :

वस्तु व सेवा कर अप्रत्यक्ष कर व्यवस्थेतील एक क्रांती आहे. तसेच जीएसटी आधुनिक जगताची कर प्रणाली आहे. अप्रत्यक्ष कर संरचनेत जितकी गुंतागुंत होती. तितकी गुंतागुंत कोणत्याच कर पद्धतीत नव्हती. या गुंतागुंतीचा फायदा मोठा व्यापारी वर्ग घेत होता. तसेच शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांशी हात मिळवणी करून या प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार करीत असत. मात्र भार शेवटी ग्रांहकावर पडत असे. किरकोळ व्यापाऱ्यांना याचा फायदा होत नव्हता. तसेच मोठया व्यापाऱ्यांना अप्रत्यक्ष कर प्रणालीत झालेल्या लाभाची कुठेच नोंद होत नव्हती. म्हणून कर चोरीचे प्रमाण सुद्धा खुप वाढले होते. यावर उपाय म्हणून जीएसटीकडे बघितले जाणे योग्य आहे.

सर्वांकशाने विचार केला तर वस्तू वसेवा कर प्रणाली भारता सारख्या देशांसाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. भारताच्या विकासाला नवीन दिशा प्राप्त होऊन आर्थिक सुधारण्याच्या स्थितीत एका नव्या पर्वाला सुरवात झाली आहे.

कोणत्याही परिवर्तन व्यवस्थेत सुरवातीला परिवर्तनाचा त्रास सर्वसामान्य जनतेला सहन करावे लागते. मात्र भविष्यात त्याचे फळ चांगले मिळतील ही अपेक्षा असते. जीएसटीच्या संदर्भात अश्या प्रकारची अपेक्षा ठेवता येईल की, हया कर पद्धतीत पारदर्शता असायला पाहिजे. ग्राहकांना माहिती व्हायला पाहिजे की नेमका कोणता कर, कोणत्या तत्वावर, किती कर लावला गेला. जेणे करून ग्राहक ते सहज स्वीकारू शकतील. मागील दोन वर्षाच्या अनुभवा वरून असे वाटते की, व्यापारी वर्गाला ही कर पद्धती क्लिष्ट वाटते. गुजरात राज्यात कपडा व्यापाऱ्यांनी या प्रणालीला केलेला विरोध व पुकारलेला संप याचे ज्वलंत उदाहरण आहे. तसेच केन्द्र सरकारने येत्या 03 वर्षा पर्यंत राज्य सरकारच्या महसुलातील तोटा 100% व चौथ्या वर्षी 75%पाचव्या वर्षी 50% भरून देण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे राज्य सरकारला याचा फायदा होईल.

- जीएसटीचे दर सुस्पष्ट असल्यामुळे राज्य सरकार व केन्द्र सरकार महसूला विषयी अंदाज बांधून कल्याणकारी योजनांची आखणी करून त्या चांगल्या प्रकारे राबवू शकतात.
- काळानुसार जीएसटी मध्ये बदल अपेक्षित आहेत. परंतु जीएसटी मुळे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात वाढ होईलच.
- भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठी सुधारणा म्हणून जीएसटी कडे पाहिले जात आहे. जीएसटीचे व्यवस्थापन करणारे जीएसटीचे नेटवर्क किंवा जीएसटीएन यामध्ये सर्वात महत्वांची भूमिका बजावीत आहे.
- वस्तू व सेवा यांची आयात म्हणजे आंतरराज्यीय पुरवठा समजला जाणार आहे. यावर आयजीएसटली लागू होणार आहे. आयात केलेल्या वस्तू व सेवा ज्या राज्यात वापरल्या जातील त्या राज्यात त्यावर जीएसटी लागू केला जाणार आहे.
- जीएसटीमुळे उत्पादने व सेवा जागतिक स्तरावरील स्पर्धेला तोंड देण्यास सक्षम होतील त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळेल.
- जीएसटी मुळे अप्रत्यक्ष कराचा पाया विस्तारणार असल्याने काही काळाने केन्द्र व राज्य याच्या महसूली उत्पादनात ही वाढ होत आहे.
- जीएसटी लागू झाल्यामुळे उत्पादन शुल्क, सेवा कर, मूल्यवर्धीत कर, मनोरंजन कर, प्रवेश कर, लॉटरी कर हे अप्रत्यक्ष कर इतिहास जमा होईल. केंद्रीय उत्पादन शुल्क रद्द होईल. याशिवाय प्रसाधनगृहा संबंधित उत्पादनावरील उत्पादन शुल्क, विशेष वस्तूवरील अतिरिक्त उत्पादन शुल्क, सेवा कर, केन्द्रीय अधिकार हे कर रद्द होऊन विक्री हस्तांतरण खेरदी अदलाबदल, भाडेतत्वावर देणे, वस्तूंची व सेवांची आयात अश्या सर्वावर जीएसटी लागू होणार आहे.

वर्तमान काळात एक राष्ट्र एक कर ही संकल्पना योग्य असून भविष्यात या कर प्रणालीचे चांगले परिणाम होईल, अशी आशा आहे.

## संदर्भ सूची :

1. वस्तू व सेवा कर कायदा एक परिचय प्रविण कामथे, प्रा. मेघना पाटील साई ज्योती प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती 2017.
2- GST The Essentials of Goods and Services Tax Dr. Thomas Joseph ThoomkuZhy, Dr. Jaya Jacob M. Ms. Chinnu Mariam Chacko. Himalaya Publishing House First Edition 2017.

3. अर्थसंवाद – मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रेमासीक जुलै–सप्टेंबर 2005 खंड 21 अंक 2.
4. लोकमत समाचार वृत्तपत्र 20 मई 2017.
5. योजना मासीक ऑगस्ट 2017.
6. अर्थसंवाद – मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रेमासीक जुलै – सप्टेंबर 2016 खंड 40 अंक 2.
7. वस्तू व सेवा कर एक दृष्टीक्षेप वित्त विभाग, महाराष्ट्र शासन.